# जाहिरात : प्रभागसंघ व्यवस्थापक पद भरती

## 'उमेद' – महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, जिल्हा परिषद, सांगली.

उमेद – महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोनती अभियानाअंतर्गत प्रभागसंघ व्यवस्थापक (CLF Manager) या पदाकरिता सांगली जिल्ह्यातील आटपाडी, जत, खानापूर तालुक्यांतील ३ आदर्श प्रभाग संघाकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत. प्रति आदर्श प्रभाग १ प्रभागसंघ व्यवस्थापक पद भरण्यात येईल. या पद भरतीबाबत तालुका व प्रभाग निहाय सविस्तर विवरण पुढीलप्रमाणे

| अ. क्र. | अ.क्र. तालुक्याचे नाव | प्रभागाचे नाव | आदर्श प्रभाग संघाचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १ | आटपाडी | खरसुंडी | वसुंधरा महिला प्रभाग संघ खरसुंडी. | १ |
| २ | जत | बनाळी | आदिशक्ती महिला प्रभाग संघ, बनाळी. | १ |
| ३ | खानापूर | भाळवणी | हिंदवी महिला प्रभागसंघ, भाळवणी | १ |
| | | | एकूण पदे | ३ |

वरीलप्रमाणे प्रती आदर्श प्रभागसंघ १ याप्रमाणे एकूण ३ प्रभागसंघ व्यवस्थापकांची पद भरती करावयाची आहे.

**सदर पदाकरिता पात्रता निकष खालीलप्रमाणे आहेत.**

१. अर्जदार महिला 'उमेद' स्वयंसहाय्यता गटाची सदस्य असावी. २. कोणत्याही शाखेची पदवी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
३. वय किमान २२ वर्षे ते कमाल ४० वर्षे असावे.
४. 'उमेद' अभियानांतर्गत गटाचा हिशोबनीस, ग्रामसंघ/प्रभागसंघ लेखापाल, समुदायस्तरीय लेखापरिक्षक, प्रेरिका, वर्धिनी, वरिष्ठ वर्धिनी, बँक सखी, आर्थिक साक्षरता सखी, पशु सखी, कृषी सखी, मत्स्य सखी, वन सखी, मास्टर कृषी सखी, कृषी उद्योग सखी, कृती संगम सखी/CTC, कृषी व्यवस्थापक, पशु व्यवस्थापक, मत्स्य व्यवस्थापक, BDSP, FL-CRP इ. उमेद अंतर्गत सर्व प्रकारच्या समुदाय संसाधन व्यक्ती म्हणून काम करण्याचा किमान ३ वर्षांचा अनुभव असणे बंधनकारक आहे.
५. उमेदवार ज्या प्रभागासाठी अर्ज करणार आहे त्या प्रभागातील मूळची रहिवाशी असणे आवश्यक आहे. ६. स्थानिक भाषेवर प्रभुत्व असणारी तसेच इंग्रजी, हिंदी भाषेमध्ये लिहिण्यास आणि वाचण्यास सक्षम असावी. ७. संगणकाचे ज्ञान असल्यास प्राधान्य देण्यात येईल. याकरिता संगणक प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र सोबत जोडावे. ८. उत्तम सुसंवादी, नेतृत्व गुण असलेली व गरीब कुटुंबांच्या प्रश्नावर संवेदनशीलतेने काम करणारी असावी. ९. प्रभागसंघाचे कार्यकारी समिती सदस्य (EC), पदाधिकारी (OB) यांच्या कुटुंबातील नसावी.
१०. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये (PRI) सदस्य नसावी.
११.अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा कार्यकर्ती म्हणून कार्यरत नसावी. कोणत्याही शासकीय संस्था/स्वयंसेवी संस्था (NGO) मध्ये सेवा देणारी तसेच स्थानिक स्वराज्य संस्था सदस्य/. स्थानिक स्वराज्य संस्था पदाधिकारी इ. म्हणून कार्यरत नसावी.
१२. स्वतःचे गाव सोडून नेमून दिलेल्या प्रभागातील गावांमध्ये प्रवास करून क्षेत्रकार्य करण्याची तसेच बाहेर गावी प्रशिक्षण कार्यशाळा इ. करिता उपस्थित राहण्याची तयारी असणे आवश्यक आहे.
१३. ज्या गट व ग्रामसंघाची सदस्य आहे, तो गट व ग्रामसंघ A किंवा B श्रेणीतील असणे आवश्यक आहे.
१४. वंचित कुटुंबांतील सदस्य, विधवा, परित्यक्त्या, अ.जा., अ.ज., दिव्यांग, आदिम जाती जमाती, एसइबीसी इ. प्रवर्गातील असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

वरील निकषांनुसार पात्र महिलांनी प्रभागसंघ व्यवस्थापक (CLF Manager) पदासाठी अर्ज करावा. सदर पद हे प्रभागसंघस्तरीय (समुदायस्तरीय संस्था) असून ११ महिन्यांच्या करार तत्त्वावर भरणेत येणार आहे. प्रभागसंघ व्यवस्थापक यांस प्रती महिना मानधन र.रु.६,०००/- अधिक प्रवास भत्ता र.रु.१५००/- संबंधित प्रभागसंघाद्वारे अनुज्ञेय राहील.

अर्जाचा नमुना प्रभागसंघस्तरावर उपलब्ध असून दि.०५/१०/२०२४ रोजी अर्ज सादर करणेचा शेवटचा दिवस आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी आपला अर्ज तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष, पंचायत समिती कार्यालय, आटपाडी/जत/खानापूर येथे कार्यालयीन वेळेत दि. २१/०९/२०२४ ते दि.०५/१०/२०२४ सायं. ६.१५ पर्यंत सादर करावा. विहित मुदतीनंतर अर्ज स्वीकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

सही/-
प्रकल्प संचालक
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, तथा
जिल्हा अभियान सहसंचालक जिल्हा
अभियान व्यवस्थापन कक्ष सांगली.

Mahabharti.in